22-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 6/21/2025 11:27 PM Page 1

NOTICE

My Wife **Late Khursid Sayed** was owning **Maruti Swift VXI Car** bearing **Reg. No. GA-06-D-9029.** After her death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 20.06.2025 Sd/-
Mr. Sardar Ahmed Sayed
Flat No. 504, 5th Floor, Prime Complex, Mundvel, Opp. Sai Sagar Chemist, Vaddem, Vasco-da-Gama, Goa

Sandeep Ads

CHANGE IN NAME

I **REHANA ABDUL GAFFAR ADMANI** r/o AG/1, RAMNATH APT, SHANKARWADI, TALEIGAO, TISWADI, GOA. like to change my name from **REHENA ADMANI** to **REHANA ABDUL GAFFAR ADMANI.** Hereafter in all my dealing and documents I will be known by the name **REHANA ABDUL GAFFAR ADMANI.**

CHANGE IN NAME

I, **Albano Jose de Menezes** r/o H.No. 319, Santarbhat P.O Piedade, Divar would like to correct my name from Albano Joseph Menezes to Albano Jose de Menezes hereafter in all my dealings and documents, I will be known by my new name **Albano Jose de Menezes.**

फक्त १५ दिवसांच्या अधिवेशनवरून विरोधकांचा हल्लाबोल

■ *टीम दैनिक हेराल्ड*

२१ जुलै ते ८ ऑगस्टदरम्यान अधिवेशन

पणजी, दि. २१ : येत्या २१ जुलैपासून सुरू होणाऱ्या गोवा विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाची कालावधी फक्त १५ दिवसांची निश्चित केल्यामुळे विरोधकांनी भाजप नेतृत्वाखालच्या राज्य सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. अधिवेशन ८ ऑगस्ट रोजी संपणार असून, त्यात केवळ १५ कामकाजाचे दिवस असतील, ज्यापैकी तीन दिवस खासगी सदस्यांच्या कामकाजासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी शुक्रवारी २१ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता गोवा विधानसभेचे अधिवेशन बोलावण्याचा अधिकृत आदेश जारी केला.

या अधिवेशनात चालू आर्थिक वर्षासाठीच्या अनुदान मागण्यांवर चर्चा होणार असून त्या संमत केल्या जातील. यावर्षी २६ मार्च रोजी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी राज्याचा अर्थसंकल्प २०२५-२६ साठी सादर केला होता आणि तेव्हाच पाच महिन्यांसाठीच व्होट ऑन अकाउंट' घेतले होते.

पावसाळी अधिवेशनासाठी केवळ १५ दिवसांची मर्यादा घालण्याचा निर्णय हा मागील वर्षाच्या १८ दिवसांच्या अधिवेशनाच्या तुलनेत स्पष्ट घट असल्याचे नमूद करत विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी सरकारवर सडकून टीका केली. त्यांनी हा निर्णय सरकारच्या अपयशांपासून पळ काढण्याचा मार्ग असल्याचे सांगितले. राज्यातील आर्थिक स्थिती असो किंवा बेरोजगारीचा प्रश्न, प्रत्येक क्षेत्रात अपयशी ठरलेल्या सरकारने २१ दिवसांचे अधिवेशन घेण्याचे पूर्वी दिलेले आश्वासन पाळलेले नाही, हे यातून स्पष्ट होते, असे ते म्हणाले.

विरोधकांनी सरकारवर अधिवेशनाला गांभीर्याने न घेण्याचा आरोप करत असेही म्हटले की, अधिवेशन बोलावले जात आहे, कारण दोन अधिवेशनांमधील कालावधी सहा महिन्यांपेक्षा जास्त होऊ नये, एवढ्यापुरताच सरकारचा हेतू आहे.

पान १ वरून

२.६ कोटींच्या सायबर फसवणूक प्रकरणी मुख्य आरोपीला अटक

तपासादरम्यान, २२ मे रोजी दोन व्यवहारांतून ₹७६.३५ लाख रक्कम केरळमधील कोझिकोडे येथे राहणाऱ्या रिजास के. (वय ३५) यांच्या नावावरील
खात्यात जमा झाल्याचे निष्पन्न झाले.
यावरून सायबर क्राइम पोलिसांनी पीआय दीपक पेडणेकर, एएसपी अक्षत आयुष , आणि एसपी राहुल गुप्ता यांच्या नेतृत्वाखालील पथक कोझिकोडेला रवाना झाले . स्थानिक पोलिसांच्या मदतीने रिजास याला अटक करण्यात आली.
कोठडीत चौकशीदरम्यान, रिजास हा सायबर फसवणुकीचा सवयीचा गुन्हेगार असून, देशभरात अशा ११ सायबर गुन्ह्यांमध्ये त्याचा सहभाग असल्याचे उघड झाले. या प्रकरणांत एकूण ₹२२.७७ कोटींहून अधिक फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.
सदर गुन्हा भारतीय दंड संहितेच्या कलम ३१८(४), ३१९(२), ३३६(३), ३(५) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६-ड अंतर्गत नोंदवण्यात आला आहे.
गोवा पोलिसांनी याप्रकरणाचा तपास सुरू ठेवला असून, नागरिकांनी अशा बनावट सरकारी कॉल्सना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे. कुठलाही संशयास्पद फोन, ईमेल किंवा संदेश आढळल्यास, नागरिकांनी त्वरित सायबर क्राइम हेल्पलाइन १९३० किंवा जवळच्या पोलिस स्थानकात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पणजी क्षेत्रीय कार्यालयात साजरा केला आंतरराष्ट्रीय योग दिवस

■ *टीम दैनिक हेराल्ड*

पणजी, दि. २१ : सेंट्रल बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय पणजी येथे आज आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून एक विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग (One Earth, One Health for Yoga) या वर्षाच्या संकल्पनेनुसार कार्यक्रमाची सुरुवात क्षेत्रीय प्रमुख श्रीमती ऑलिव्हिया परेरा यांच्या हस्ते बँकेचे संस्थापक सर सोराबजी पोचखानवाला यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून झाली.

या प्रसंगी योग प्रशिक्षिका श्रीमती स्वाती कारंडे यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना प्राणायाम, विविध योगासने आणि ध्यान यांचा सराव करून घेतला. सत्रादरम्यान त्यांनी योगाचे शारीरिक व मानसिक लाभ यावरही प्रकाश टाकला.

बँकेच्या कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त भाग घेवून नियमित योग करण्याचे ठरवले. कार्यक्रमाचा समारोप धन्यवाद व ग्रुप फोटो काढून करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सेंट्रल बँक ऑफ इंडियाने केवळ आपल्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण केली नाही, तर योगाच्या प्रसारातही महत्त्वपूर्ण योगदान दिले.

म्हार्दोळची पारंपरिक जाई – चमेली धोक्यात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

वारसा स्थळ म्हणून मान्यता देण्याची मागणी

फोंडा, दि. २१ : शंभराहून अधिक वर्षांची परंपरा लाभलेल्या म्हार्दोळ येथील जाई – चमेलीच्या फुलांची पारंपरिक लागवड सध्या नामशेष होण्याच्या संकटात असून, हा अनोखा सुगंधी वारसा वाचवण्यासाठीम्हार्दोळचा फुलकर समाज पुढे सरसावला आहे. या पार्श्वभूमीवर वेलिंग-प्रियोळ-कुंकळळी पंचायतीच्या कार्यालयात राज्य जैवविविधता मंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत विशेष बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत फुलकर समाज म्हार्दोळचे अध्यक्ष प्रताप नाईक, आणि सुमारे ७० फुलशेतकरी आणि राज्य जैवविविधता मंडळाचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत म्हार्दोळमधील जाई लागवडीचे वारसा स्थळ म्हणून जतन करण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

गेल्या काही वर्षांत म्हार्दोळमधील जाई लागवडीच्या जमिनीवर मालकी हक्कासंबंधी वाद निर्माण झाला आहे. या वादामुळे शेतकऱ्यांवर त्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या उपजीविकेवर गदा आली आहे.

या वादात चमेलीची लागवड करणाऱ्या मोलेकर कुटुंबांनी जमीन मालकांशी चर्चा करून तोडगा काढण्याचा निर्णय घेतला असून, ग्रामसभेच्या माध्यमातूनही या विषयावर लवकरच व्यापक चर्चा होणार आहे.

फुलकर समाजाच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही वर्षांत अज्ञातांनी लावलेल्या आगीमुळे अनेक जुनी जाई लागवडीची क्षेत्रे जळून खाक झाली आहेत. यामुळे जवळपास शंभर वर्षांची परंपरा असलेल्या फुलांची लागवड धोक्यात आली आहे, आणि शेतकऱ्यांच्या रोजीरोटीवरही परिणाम झाला आहे.

या गंभीर पार्श्वभूमीवर, राज्य जैवविविधता मंडळाकडे या क्षेत्राला वारसा स्थळाचा दर्जा देण्याची अधिकृत मागणी करण्यात आली आहे. ही मागणी मान्य झाल्यास जाईच्या लागवडीला कायदेशीर संरक्षण मिळू शकते, असे फुलकर समाजाचे मत आहे.

म्हार्दोळमधील 'जाईची ' फुले त्यांच्या अद्वितीय सुगंधासाठी संपूर्ण गोव्यात ओळखली जातात. गोव्यातील ग्राहक या फुलांना विशेष प्राधान्य देतात. दरवर्षी मर्दोळ येथील महालसा मंदिरात होणाऱ्या जय पूजेसाठी या फुलांचा वापर होतो.

विशेष बाब म्हणजे, या पूजेच्या दिवशी सर्व मोलेकर कोणतीही विक्री न करता संपूर्ण उत्पन्न फुलांची देवी महालसाला अर्पण करतात. ही परंपरा गेली शंभर वर्षे अखंडपणे सुरू आहे, आणि त्यामुळेच या फुलांना धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वही लाभले आहे.

मोपा सरकारी उच्च प्राथमिक विद्यालयात क्रांतिदिन उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

पेडणे, दि. २१ : मोपा सरकारी उच्च प्राथमिक विद्यालयात क्रांतिदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे शाळेचे मुख्याध्यापक महेश चंद्रकांत कशालकर, शिक्षक संदीप असोलकर, संजना शेट्ये, सोनल नावेलकर, प्रिया असोलकर, शितल महाले, मनिषा परब, पुजा नाईक, श्रद्धा ठाकुर, सुश्मिता शेलार आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रथम उपस्थित मान्सवरांनी डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. १८ जून १९४६ रोजी पोर्तुगीज सत्तेला गोव्यातील जनतेने डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या नेतृत्वाखाली संघटितपणे सभेच्या निमित्ताने आव्हान दिले तो दिवस म्हणजेच क्रांतिदिन असे शाळेचे मुख्याध्यापक महेश कशालकर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सांगितले. शिक्षिका मनिषा परब यांनी क्रांतिदिनबद्दल माहिती दिली. पलक सावंत व प्राची परब या विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

पुरुषोत्तम वालावलकर उच्च माध्यमिक विद्यालयात ग्राहक जागृतीच्या सत्राचे आयोजन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

पणजी, दि. २१ : पुरुषोत्तम वालावलकर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या ग्राहक जागृती समितीच्या वतीने उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षकांसाठी विशेष सत्र आयोजित करण्यात आले होते या सत्रासाठी मार्गदर्शक म्हणून गोवा सीवीक अँड कंन्सुमर नेटवर्क गोवा केन) या संस्थेचे समन्वय व समाज कार्यकर्ते श्री रोनाल्ड मारटिन्स उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थीनी कु. रुचा परब हिने सादर केलेल्या ईशस्तवनाने झाली विद्यालयाच्या प्राचार्या सौ. सुप्रिया नेत्रावळकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. विद्यालयाच्या ग्राहक जागृती समितीचे सदस्य शिक्षक श्री झहीर शेख यांनी सत्राचे मार्गदर्शक श्री रोनाल्ड मारटिन्स यांची ओळख करून दिली.

प्राचार्या सौ. सुप्रिया नेत्रावळकर यांनी पुष्पकुंडी देऊन मान्यवरांचे स्वागत केले. तद्नंतर मान्यवरांनी सूत्रे आपल्या हाती घेऊन खेळीमेळीने शिक्षकांमध्ये ग्राहक जागरुकता निर्माण केली व शिक्षकांच्या समस्यांचे निराकरण केले. विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. किर्ती सावकार यांनी सत्राचे मार्गदर्शक, आयोजक व उपस्थितांचे आभार मानले. शिक्षिका बिंदू या जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

योग दिनानिमित्त राज्यभरात कार्यक्रम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

पणजी, दि. २१ : ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शनिवारी गोव्यात विविध ठिकाणी योग सत्रांचे आयोजन करण्यात आले. राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई आणि मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत योग हे भारताने मानवतेला दिलेले अमूल्य योगदान असल्याचे अधोरेखित केले.

मुख्यमंत्री सावंत यांनी बांबोळी येथील डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित मुख्य कार्यक्रमाचे नेतृत्व केले. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे योग ही आरोग्य, शांती आणि अंतर्गत समतोल वाढवणारी एक जागतिक चळवळ बनली आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, योग हे स्वतःशी, निसर्गाशी आणि विश्वाशी जोडणारे माध्यम असून प्रत्येकाने जीवनशैली म्हणून या प्राचीन परंपरेचा स्वीकार करावा.

राज्यपाल पिल्लई यांनी राजभवनातील जुन्या दरबार हॉलमध्ये योग सत्राचे नेतृत्व केले. यावेळी राजभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कुंडई येथील तपोभूमीशी संलग्न अनुभवी योग प्रशिक्षक धनंजय पाटील यांनी सहभागींचे मार्गदर्शन केले.

दरम्यान, समाजकल्याण मंत्री सुभाष फळदेसाई यांनी सांगे येथील श्रीसन प्लाझा हॉलमध्ये आयोजित योग सत्रात सहभाग घेतला. हा कार्यक्रम भारतीय जनता पक्ष सांगे सद्गुरु पद्मनाभ योग गुरुकुल आणि पीएचसी सांगुएम यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.

योग दिनाच्या निमित्ताने अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा संचालनालयाने देखील एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग या जागतिक थीमवर आधारित विशेष सत्र आयोजित केले. हे सत्र श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशन'च्या गोवा शाखेच्या सहकार्याने पार पडले. यामध्ये एकूण ११० अग्निशमन व आपत्कालीन सेवा कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

राज्यातील विविध पोलिस ठाणे, शासकीय कार्यालये तसेच सामाजिक संस्था यांनीही योग दिनानिमित्त विशेष सत्रांचे आयोजन करून जनजागृती केली.

इराण मधून आणखी ३१० भारतीयांचे भारतात सुखरूप आगमन

नवी दिल्ली, दि. २१ :

इस्त्रायल-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाने सुरू केलेल्या ऑपरेशन सिंधू' अंतर्गत इराणमधून आणखी ३१० भारतीय नागरिकांना घेऊन आलेले विमान शनिवारी दुपारी ४:३० वाजता दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षितपणे उतरले, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली.

या नवीन घडामोडीनंतर भारतात परत आणलेल्या नागरिकांची एकूण संख्या ८२७ वर पोहोचली आहे.जयस्वाल यांनी स्पष्ट केले की, हे विमान इराणच्या मशहाद शहरातून उड्डाण करून भारतात आले. मागील २४ तासांत इराणमधून परत आलेले हे तिसरे विमान होते. याआधी, शुक्रवारच्या दिवशी मिहान एअरचे एक विमान २५६ भारतीय विद्यार्थ्यांना घेऊन नवी दिल्लीला पोहोचले होते, यातील बहुतांश विद्यार्थी जम्मू आणि काश्मीरमधील होते.

मध्यपूर्वेतील तणावग्रस्त वातावरणामुळे इराणमध्ये अडकलेल्या भारतीय विद्यार्थ्यांचे कुटुंबीय त्यांचे स्वदेशात आगमन होताच दिलासा घेताना दिसले.दिल्ली विमानतळावर पोहोचलेले विद्यार्थी थकलेले असले तरी सुरक्षिततेची भावना त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

जम्मू आणि काश्मीर विद्यार्थी संघटनेने भारत सरकारचे आभार मानत एक निवेदन प्रसिद्ध केले असून, त्यात म्हटले आहे, सरकारच्या वेळीच घेतलेल्या निर्णयामुळे आणि इराणी अधिकाऱ्यांशी समन्वयातून ही सुटका शक्य झाली. दुर्गम भागात राहणाऱ्या उर्वरित विद्यार्थ्यांचेही लवकरात लवकर सुरक्षित स्थलांतर व्हावे, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

सध्या सुरु असलेली ही मोहिम परराष्ट्र मंत्रालयाने गेल्या आठवड्यात सुरू केली असून, इस्त्रायल-इराण संघर्षामुळे निर्माण झालेल्या असुरक्षित परिस्थितीतून भारतीय नागरिकांना सुखरूप परत आणण्याचे उद्दिष्ट या मोहिमेमागे आहे.

भारत सरकारने इराणमधील तेहरान व मशहाद या शहरांदरम्यान समन्वय साधून विद्यार्थ्यांना आणि इतर नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले. सुमारे १,००० भारतीय नागरिकांना विशेष विमानांद्वारे मायदेशी परत आणण्याचे लक्ष्य आहे.

येत्या काळातही ही मोहिम सुरु राहणार असून, तुर्कमेनिस्तानच्या राजधानी अश्गाबात येथून रविवारी पहाटे ३ वाजता येणाऱ्या विमानासह आणखी दोन विमाने नियोजित असल्याचे समजते.

तेहरानमधील भारतीय दूतावासाने शनिवारी स्पष्ट केले की, भारत सरकार इराणमध्ये अडकलेल्या सर्व नागरिकांना बाहेर काढण्यासाठी कटिबद्ध आहे.

गोवा क्रांतीदिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज सरकारी प्राथमिक शाळा डिचोली येथे कार्यक्रम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

डिचोली, दि. २१ : छत्रपती शिवाजी महाराज सरकारी प्राथमिक शाळा डिचोली येथे गोवा क्रांती दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक श्री.श्रीगणेश गोपाळ गावडे,शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. रंजीता आलोक लाड,सदस्य,इतर पालकांची उपस्थिती होती. या वेळी पालक सौ.मेघा देवरे,सौ.शामल चारी,श्री.पांडुरंग परब, शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेला वंदन करून आणि दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर शाळेच्या परिसरातून भव्य देशभक्तिपर मशाल मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी हातात फलक व झेंडे घेऊन जय गोवा, जय भारत अशा घोषणांनी परिसर दुमदुमवून टाकला.

यानंतर हुतात्मा स्मारकाजवळ जाऊन पूजन करण्यात आले व गोव्याच्या स्वातंत्र्य संग्रामात बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विद्यार्थ्यांनी क्रांती दिनाचे महत्त्व सांगणारे भाषण देखील सादर केले.

PUBLIC NOTICE

The general public Notice is hereby informed that my client *TERRAVESTA BUILDWELL LLP* has filed a civil suit bearing case No. SCS/86/2025/C pending before the Hon'ble Civil Judge Senior Division at Mapusa, Goa, wherein my client has filed suit for Specific Performance u/s 10 of Specific Relief Act, 1963 r/w sec. 9 of CPC, on the said property owned by 1) **MR. SADANAND DINKAR LAD** 2) **MRS. PARVATI SADANAND LAD** 3) **MR. KAILASH SADANAND LAD** 4) **MR. ULLHAS DINKAR LAAD** 5) **MRS. NISHA ULLHAS LAAD** 6) **MR. SANTOSH DINKAR LAD** 7) **MRS. SHOBHA SANTOSH LAD** 8) **MRS. AKSHAYA AMEY KAMAT** 9) **MRS. SORUBAI DINACORA SINAI LADA ALIAS NETRA ANANT KAMAT** or **SARASWATI ANANT KAMAT alias MRS. SARASWATI ANANT KAMAT alias SARASWATI NETRAANANT KAMAT alias SARASWATI NETRA ANANT KAMAT** 10) **MR VASANT ALIAS SUBHASH GOPAL KUDCHADKAR** 11) **MRS. RASHMI SUBHASH KUDCHADKAR** 12) **MS. SMITA GOPAL KUDCHADKAR alias SMITA KUDCHADKAR**, the said property surveyed under **survey No. 79, sub division No. 26** of Village **Camurlim** survey records, described in detail in Schedule hereunder written.

Accordingly, Public is hereby informed and cautioned that no one should enter into any transactions including Agreements, Sale, Lease, Mortgage etc. with the owners towards the sale of the property better described in the schedule herein below and anyone doing so shall do so at his/her own risk and the same shall not bebinding on my client and the said transaction shall be null and void.

SCHEDULE

(DESCRIPTION OF SAID (SALE) PROPERTY)

ALL THAT property known as **"VAHDLI BHAWAN"**, totally admeasuring an area of **2550** sq. mts., situated at **Camurlim** Village, of Bardez Taluka, within the limits of Camurlim Village Panchayat, Taluka and Sub District of Bardez, North Goa District of the State of Goa, bearing Survey No. 79/26 of Camurlim Village. The said property is bounded as under:

ON THE NORTH: By property bearing survey No. 79/17; ON THE SOUTH: By property bearing survey No. 79/31, 79/33 and 79/28; ON THE EAST: By road; ON THE WEST: By property bearing survey No. 79/25 and 79/27.

Sd/- **Sairaj Ulhas Bhaje (Advocate)**
Office No. 507, Citi Centre,
Patto, Panaji, Goa Ph: **7972286100**

IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR-II OF PONDA, AT PONDA-GOA

Case No: JM-11/Mund/C2/Usg/02/2024

1) Mr. Jovito Mendes (Since deceased)
Through his legal heirs
1a) Mr. Joel Mendes
1b) Mr. Desmond Mendes
2) Mrs. Sebastina Olivia Mendes
All r/o H. No. 565/1, Sonarbag, Usgao, Ponda Goa .....Applicant

V/s

1) Mr. Shripad Singbal (Since deceased)
Through his LR's
1a. Mr. Sachin Shripad Singbal
R/o 30/A, Girijashankar,
Layemati Davorlim, Margao Goa
2) Mr. Maniklal Singbal
R/o Idinha Apartments., Near Pandava Chapel, Aquem, Margao-Goa
3) Mr. Anil Singbal
R/o Vishwashanta Housing. Co Operative, Society. Shantinagar, Ponda Goa
4) Mr. Subhash Singbal
5) Adv. Mrs. Deepa A. Singbal
6) Mr. Prashant Singbal
All R/o Holiebath, Madlawada,
Savoi-Verem, Ponda Goa
7) Mr. Swapnil S. Singbal
R/o Pranit Apartments, Near Petrol Pump, Hindawadi, Belgavi -,Karnataka
8) Mr. Nilesh V. Singbal
R/o Near Ravi Naik Bungalow, Khadpabandh, Ponda- Goa
9) M/s Sigrun Realties Limited
Office at Fairlink Centre, 10th Floor, Plot No. B-64 Off.link Road, Andheri (W) Mumbai 400058 ...Respondents

PUBLIC NOTICE

To,
The Respondents No. 3 & 9

Whereas the applicant has made an application to this Court under section 16(1) of the Goa, Daman & Diu Mundkar (Protection from Eviction) Act, 1975.

AND WHEREAS the notice sent to the above mentioned opponent is returned back with the postal remark as **"Unclaimed"**. It is reported by the Adv. for Applicants that he is unaware of the present residential addresses of the Respondents and their legal heirs and above mentioned addressed is the last known address.

AND WHEREAS, the applicant moved an application on 27/05/2025 and prayed before this Court for Public Notice to be published in the local newspaper as substitute service U/s 5 r/w order V rule 20 1(a) of Civil Procedure code to the above named opponent who have not been served with the notice. And whereas, this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service.

Therefore, the notice is hereby given to the above Respondent to appear before this Court in person or by duly authorized agent on **16/07/2025 at 10.30 a.m.** to give your say on the above mentioned date and time. Take notice that in default of your appearance the application will be heard and decided in your absence.

Given under hand and the seal of this Court dated this 17th day of June, 2025.

Sd/- **(Rosario Carvalho)**
Joint Mamlatdar - II of Ponda Taluka, Ponda, Goa.

NOTICE TO BE SERVED BY PUBLICATION
(Under Order V Rule 20 (1A) of CPC)
DISTRICT AND SESSIONS COURT MERCES
IN THE COURT OF Ad-hoc District Judge-2 & ASJ, Tiswadi, North Goa.
Execution Application No: 210/2022
Lokmanya Multipurpose Co-op. Society Ltd
Vs
Shri. Mubeen Siddiqui & ors.

To, Judgement Debtor no. 1
Shri Mubeen Siddiqui, Resident of Flat no.F Lakemay Apt, Kranti Nagar, Porvorim, Goa 403501.
And
Also resident of 120, Subhash Furniture Mart, Saibaba Nagar, 90 Feet Road, Mumbai-400017
And
Also resident of Destiny Electronics, New Muncipal Market, 1st Floor Shop Mo.CCB 290, Panaji Goa 403001

WHEREAS, the Advocate for the Decree Holder has filed an Execution Application before this Court for execution of Award dated 4.10.2021 by Arbitrator in Arbitration Case No. ARB/LOK/Map/34-20 and therein filed an application for attachment of Immovable property of Judgement Debtor no.1 under order 21, Rule 54 and Rule 43 of CPC.

AND WHEREAS, notices sent to you at the last available address have returned unserved to this Court, as such you are not served.

AND WHEREAS, the Advocate for the Decree-holder has filed an Application praying for substituted service by publishing in the daily Newspaper which is widely circulated in the locality on the last known address and this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service.

NOW, THEREFORE, notice is hereby given to you under Order V Rule 20 (1)(A) of C.P.C. to appear in this Court on the **07/7/2025 at 10.00 a.m**

TAKE, note that in default of your appearance on date and time herein before mentioned, the application will be heard and determined in your absence.

GIVEN under my hand and the seal of this Court, this 20th day of the month of June, of the year 2025.

Sd/- (Shilpa Pandit)
Adhoc District Judge-2, ASJ Merces
SEAL

पाहिजेत

Wanted Counter sales boys and sales girls (Kindly put in bold) staying in and around Panjim,
Pls. Contact Tel. Nos. 9011937381

व्यवसाय

Shop for rent at Panjim, Jairam Complex, Mala, Panjim.
Pls. Contact Tel. Nos. 9011937381